


वैशाली रोडे
विशेष लेख
पान ८

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

मुंबई ● शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २२ ● अंक १४० ● पाने १० ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in

दक्षिण आफ्रिकेचा वेस्ट इंडिजवर ९ विकेट्सनी दणदणीत विजय

पान : क्रीडा



## वेचक

### सन २०२७ ची जनगणना पूर्णपणे डिजिटल

**नवी दिल्ली :** पारंपरिक कागद-पेनवर आधारित जनगणनेला पूर्णविराम देत, २०२७ ची जनगणना ही पूर्णपणे डिजिटल स्वरूपाची असेल. या मोहिमेसाठी 'सेन्सस मॅनेजमेंट अँड मॉनिटरिंग सिस्टम' (सीएमएमएस) हे एक समर्पित डिजिटल संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. भारताच्या इतिहासातील ही पहिलीच संपूर्णपणे डिजिटल जनगणना असणार आहे. भारताचे महानिबंधक (आरजीआय) मृत्युंजय कुमार नारायण यांनी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पाठवलेल्या परिपत्रकात म्हटले की, 'या संकेतस्थळाद्वारे वापरकर्ते तयार करणे, प्रशिक्षण मॉड्यूल हाताळणे, ओळखपत्रे तयार करणे आणि नेमणूक पत्रे जारी करणे यांसारखी कामे सुलभ होतील.

### नवी मुंबई विमानतळावरून आणखी सहा शहरांमध्ये सेवा

**मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून देशातल्या सहा शहरांमध्ये इंडिगो नव्याने विमानसेवा सुरू करणार आहे. येत्या २९ मार्चपासून ही सुविधा सुरू होणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अहमदाबाद, दीव, गोवा, राजकोट, बेळगाव आणि कोल्हापूर अशा प्रमुख सहा शहरांसाठी या विमानतळावरून विमाने उड्डाण करणार आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २५ डिसेंबर २०२५पासून सेवा सुरू झाली आहे. सुरुवातीला देशातील काही मोजक्याच ठिकाणांसाठी नवी मुंबई विमानतळावरून विमानसेवा पुरवली जात होती.

### न्यायालयीन भ्रष्टाचारावरील धडा असलेल्या पुस्तकावर सर्वोच्च न्यायालयाकडून बंदी

**नवी दिल्ली :** एनसीईआरटीच्या आठवीच्या पाठ्यपुस्तकातील वादग्रस्त उताऱ्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी कठोर भूमिका घेतली. सुनावणीदरम्यान एनसीईआरटीच्या आठवीच्या पाठ्यपुस्तकावर न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचारावरील प्रकरणावर बंदी घातली. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठाने "न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचार" या उताऱ्याभोवतीच्या वादावर सुनावणी केली. मुख्य न्यायाधीशांनी कडक टिप्पणी करताना म्हटले की, एनसीईआरटीची माफी पुरेशी नाही.

# महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत ११ वर्षांत तिप्पट वाढ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत माहिती

## राज्यातील विरोधी पक्ष भ्रमित आणि संभ्रमित असल्याचा टोला

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

"महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०१२-१३ साली १३ लाख कोटी होती. गेल्या ११ वर्षांत ती ५१ लाख कोटींपर्यंत आली. आम्ही राज्याची अर्थव्यवस्था तिपटीने वाढवली. आता ९० लाख कोटींचा टप्पा गाठायचा आहे. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, ज्याने ६६० बिलियनचा टप्पा पार केला आहेत. इतर कुठलेही राज्य अर्थव्यवस्थेच्या बाबतीत आपल्याइतके पुढे नाही. त्यामुळे राज्य दिवाळखोरीत निघाल्याचे सांगून विरोधक जनतेची दिशाभूल करीत आहेत", असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत केला.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशाच्या जीडीपीमधील महाराष्ट्राचा वाटा सातत्याने वाढत आहे. २०२१-२२ मध्ये हा वाटा १३.१ टक्के होता, २०२३-२४ मध्ये १३.५ टक्के, २०२४-२५ मध्ये १३.८ टक्के झाला असून आता तो १४ टक्क्यांच्या जवळपास जाईल, असा प्राथमिक अंदाज आहे. राज्याचे जीएसटी संकलन जवळपास ३ लाख ६० हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचले असून कृषी निर्यातीत १२ टक्के आणि सेवा क्षेत्रात २४ टक्के वाटा आहे. जीडीपीच्या तुलनेत कर्जाचे प्रमाणही नियंत्रित ठेवण्यात महाराष्ट्र यशस्वी ठरल्याचा दावा त्यांनी केला.



### टिपूची शिवरायांशी बरोबरी खपवून घेणार नाही

७५ हजार हिंदूंची कत्तल करणाऱ्या टिपू सुलतानशी शिवरायांशी बरोबरी केलेली खपवून घेणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठामपणे सांगितले. तसेच, "देशाचा खरा इतिहास ७० वर्षे जाणीवपूर्वक लपवून ठेवण्यात आला. जर योग्य वेळी नीट आणि वस्तुनिष्ठ इतिहास शिकवला गेला असता, तर आज या देशातील एकाही मुसलमानाने क्रूरकर्मा औरंगजेबाला आपला 'हिरो' मानले नसते. हे आम्हाला कधीच शिकवले नाही." अशा शब्दांत त्यांनी विरोधकांवर प्रहार केला.

### कुंभमेळा हा केवळ धार्मिक मेळा नव्हे

नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्या संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, हा केवळ धार्मिक मेळा नसून शाश्वत पायाभूत सुविधांच्या उभारणीची संधी आहे. गोदावरी स्वच्छता, सांडपाणी प्रक्रिया, रस्ते रुंदीकरण आणि रिंग रोड यांसारख्या कामांमुळे दीर्घकालीन विकास साधला जाईल आणि नाशिकचे जागतिक ब्रँडिंग होईल.



२०२९-३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था उभारण्याचा रोडमॅप तयार करण्यात आला आहे. या आराखड्यासाठी ३ लाख ८० हजार नागरिकांचा सहभाग आणि ७ लाखांहून अधिक सूचनांचा विचार करण्यात आला. प्रगतशीलता, शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि सुशासन या चार तत्त्वांवर १६ प्रमुख थीम आणि १०० उपक्रम निश्चित करण्यात आले आहेत. दरवर्षी १० लाख रोजगारनिर्मिती, दरडोई उत्पन्नात दहापट वाढ आणि मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट त्यांनी स्पष्ट केले.

### बेरोजगारीचा दर कमी करण्यात यश

● बेरोजगारीबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, २०२१-२२ मध्ये बेरोजगारी दर ४ टक्के होता, २०२३-२४ मध्ये तो ३.३ टक्क्यांवर आला आणि २०२५ मध्ये ३.१ टक्के आहे. महायुती सरकारच्या कार्यकाळात १ लाख २० हजार ४४९ जणांना सरकारी नियुक्त्या देण्यात आल्या असून लवकरच हा आकडा दीड लाखांवर जाईल.

● गडचिरोलीतील स्टील हबसंदर्भात २ लाख ६१ हजार ८३९ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि सुमारे ७० हजार ८९५ रोजगारनिर्मिती होणार असल्याचे त्यांनी सांगितले. जल, जमीन आणि जंगलाचे संवर्धन करत ५ कोटी झाडे लावण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्थानिक आदिवासींना प्राधान्य देत विकास साधला जात असल्याने नक्षलवाद आटोक्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

● स्टार्टअप क्षेत्रात महाराष्ट्र देशात आघाडीवर असून देशातील नोंदणीकृत स्टार्टअपपैकी २० टक्के महाराष्ट्रात आहेत. १४६ पेक्षा अधिक इन्क्युबेटरचे जाळे उभारण्यात येत आहे. त्यामुळे महाराष्ट्राला 'स्टार्टअप कॅपिटल' म्हणून ओळख मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## महाराष्ट्रात सक्ती फक्त मराठीचीच !

■ "महाविकास आघाडी सरकारच्या काळात हिंदी सक्तीबाबत निर्णय झाला आणि त्यावर तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची सही होती. आमच्या सरकारच्या काळात महाराष्ट्रात सक्ती फक्त मराठीचीच राहील", अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत दिली.

■ राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, "नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना २१ सप्टेंबर २०२० रोजी तज्ज्ञ समितीची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स स्थापन झाला. या समितीने १४ सप्टेंबर २०२१ रोजी सादर केलेल्या १०१ पानांच्या अहवालात पहिलीपासून इंग्रजी आणि हिंदी ही दुसरी भाषा म्हणून अनिवार्य करण्याची शिफारस केली होती. ३० जानेवारी २०२२ रोजी हा अहवाल मंत्रिमंडळासमोर आला आणि तत्कालीन सरकारने या शिफारसी स्वीकारल्या. ज्यांनी स्वतः या निर्णयावर स्वाक्षरी केली, तेच आज आम्हाला 'ठोकून' काढत आहेत. विशेष म्हणजे यात राज ठाकरेही सहभागी झाले. माझ्यामुळे दोन्ही भाऊ एका मुद्द्यावर एकत्र आले याचा मला आनंद असून त्याचे श्रेय मला घ्यायला आवडेल", असे मुख्यमंत्री म्हणाले.

■ मराठी शाळांच्या सद्यस्थितीवर भाष्य करताना मुख्यमंत्र्यांनी आकडेवारीनिशी बाजू मांडली. "आजही राज्यातील ८४ टक्के शाळा मराठी माध्यमाच्या असून ७० टक्के विद्यार्थी त्यात शिक्षण घेत आहेत. मराठी शाळा बंद पडत असल्याची आकडेवारी कपोलकल्पित आहे. आपण आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत पाठवतो आणि इथे मराठी शाळांवरून केवळ भावनिक राजकारण करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण मातृभाषेत उपलब्ध करून दिले, ही खरी मराठीची, भाषेची सेवा आहे," असेही त्यांनी नमूद केले.

# राज्यात लवकरच 'धर्मांतरबंदी' कायदा

## गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांचे संकेत

## मदरशांची सखोल तपासणी

◆ **मुंबई (प्रतिनिधी):**

प्रलोभने दाखवून किंवा बळजबरीने केल्या जाणाऱ्या धर्मांतराच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी राज्य सरकार आता कठोर पावले उचलण्याच्या तयारीत आहे. राज्यात लवकरच 'धर्मांतरबंदी कायदा' लागू करण्याचे संकेत गृहराज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर यांनी गुरुवारी विधान भवन परिसरात माध्यमांशी बोलताना दिले.

धर्मांतराच्या तक्रारींची दखल घेत सरकार या संदर्भातील कायद्याचा मसुदा आणि अंमलबजावणीबाबत गांभीर्याने विचार करत आहे. कोणाचेही नुकसान करण्याचा आमचा हेतू नाही, मात्र कायद्याचा धाक असणे आवश्यक आहे, असे भोयर म्हणाले. राज्यातील मदरशांमध्ये चालणाऱ्या उपक्रमांबाबतही त्यांनी महत्त्वपूर्ण विधान केले. मदरशांमधील कामाची आणि तिथे घडणाऱ्या प्रकारांची सखोल पडताळणी केली जाईल. त्यानंतर पुढील योग्य तो कायदेशीर निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एका मदरशात दोन लहान मुलांना अमानुष मारहाण होत असल्याचा व्हिडीओ समाज माध्यमांवर प्रसारित झाला आहे. या प्रकरणाची सत्यता पडताळण्याचे आदेश सिंधुदुर्ग पोलिसांना देण्यात आले असून, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### ... तर ऑर्केस्ट्रा बारचा परवाना जप्त होईल

राज्यात ऑर्केस्ट्रा बारच्या नावाखाली चालणाऱ्या अवैध धंद्यांवर सरकारने चाप बसवण्याचे ठरवले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बारचा परवाना पहिल्यांदा काही दिवसांसाठी निलंबित केला जाईल. मात्र, वारंवार नियमांची पायमल्ली होत असल्याचे आढळल्यास, संबंधित बारचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असा इशारा भोयर यांनी दिला.

# नियम मोडला, तर लायसन विसरा!

## देशात 'ग्रेड' आधारित ड्रायव्हिंग लायसन प्रणाली

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

देशातील रस्ते अपघात कमी करण्यासाठी आणि जबाबदार ड्रायव्हिंगला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार ग्रेड (गुण) आधारित ड्रायव्हिंग लायसन प्रणाली सुरू करण्याची योजना आखत आहे. यामध्ये वाहतूक नियम मोडल्यास लायसन्स रद्द किंवा निलंबित करण्याची तरतूद असेल.

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले की, दरवर्षी देशात सुमारे १.८ लाख लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू होतो. याची मुख्य कारणे आहेत की, गाडी चालवताना मोबाईल फोनचा वापर, अति वेग, चुकीच्या दिशेने गाडी चालवणे आणि नशेत वाहन चालवणे.

ते म्हणाले की, लोकांचा जीव मौल्यवान आहे आणि सरकार रस्ते सुरक्षेसाठी पावले उचलत आहे.

### दरवर्षी भारतात ५ लाख रस्ते अपघात

भारतात दरवर्षी ५ लाख रस्ते अपघात होतात. यामध्ये १.८ लाख लोकांचा मृत्यू होतो. यापैकी ७२ टक्के मृत्यू १८ ते ४५ वयोगटातील लोकांचे असतात. १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या १० हजार ११९ लोकांचा मृत्यू झाला. हेल्मेट न घातल्यामुळे ५४ हजार १२२ मृत्यू झाले. सीट बेल्ट न लावल्यामुळे १४ हजार ४६६ लोकांचा मृत्यू झाला. भरधाव वेगामुळे १.२ लाख मृत्यू झाले. इतर कारणांमध्ये चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, दारू पिऊन गाडी चालवणे आणि मोबाईलचा वापर करणे यांचा समावेश आहे. मंत्र्यांनी लोकांना आवाहन केले की, रस्ते अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला मदत करावी आणि उपचाराचा खर्च किंवा कायदेशीर अडचणींची चिंता करू नये.

# घर खरेदीत फसवणूक करणाऱ्या बिल्डरांची मालमत्ता जप्त होणार

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

राज्यात आपले गृहस्वप्न साकार करू पाहणाऱ्या हजारो सर्वसामान्यांची बिल्डरांकडून होणारी फसवणूक आता राज्य सरकारने गंभीरपणे घेतली आहे. महारेराने घर खरेदीदारांच्या नुकसान भरपाईपोटी जारी केलेल्या आदेशांची पायमल्ली करणाऱ्या आणि वसुलीस दाद न देणाऱ्या विकासकांवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय सरकारने घेतला. फसवणूक करणाऱ्या अशा बिल्डरांची मालमत्ता जप्त करून त्यातून ग्राहकांची थकीत रक्कम वसूल केली जाईल, अशी घोषणा प्रभारी गृहनिर्माण मंत्री शंभूराज देसाई यांनी गुरुवारी विधानसभेत केली.

आमदार अतुल भातखळकर, जितेंद्र आव्हाड, सुलभा खोडके, प्रताप पाटील चिखलीकर यांसह अन्य सदस्यांनी महारेराच्या कारभारावर जोरदार ताशेरे ओढले. मुंबई, ठाणे आणि पुण्यात सुमारे १ हजार २०० ग्राहकांची ७९२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक आकडेवारी सभागृहात मांडण्यात आली.

महारेरा स्थापन झाल्यापासून १ हजार २९१ तक्रारदारांच्या बाजूने ७९२ कोटींचे वसुली आदेश देण्यात आले. मात्र, यातील २०० कोटींचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी 'वसुली शक्य नाही' असे कारण देत परत पाठवले आहेत. यावरून सदस्यांनी संताप व्यक्त करत, 'महारेरा हे घर खरेदीदारांना न्याय देण्याऐवजी विकासकांना मुदतवाढ देणारे एक्स्टेंशन काउंटर झाले आहे का?' असा संतप्त सवाल केला. सभागृहात झालेल्या चर्चेला उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई यांनी वस्तुस्थिती मान्य केली. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काही तांत्रिक कारणांमुळे वसुली रखडल्याचे त्यांनी सांगितले.

**अशी होणार कारवाई :** प्रभारी मंत्री शंभुराज देसाई म्हणाले, ज्या विकासकांनी ग्राहकांचे पैसे परत केलेले नाहीत, त्यांच्या मालमत्ता जप्त करून त्यांचा लिलाव केला जाईल. थकीत वसुलीच्या आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. करारातील नमूद क्षेत्रापेक्षा कमी जागा देणाऱ्या बिल्डरांचीही चौकशी केली जाणार आहे. घर खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. वसुलीसाठी लवकरच व्यापक मोहीम हाती घेऊन सर्वसामान्यांना त्यांचा हक्काचा पैसा मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# फी थकली तर शाळेने विद्यार्थ्याला काढणे बेकायदेशीर

## उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

◆ **नागपूर (प्रतिनिधी) :**

शाळांच्या परीक्षा एक तर सुरू आहेत किंवा सुरू होणार आहेत. अशावेळी कित्येक विद्यार्थ्यांची शाळेची फी थकली म्हणून नोटीस देण्यात येत आहे आणि शाळेतून काढून टाकण्यात येईल, अशा धमक्या शाळांकडून देण्यात येणे सामान्य बाब झाली आहे. अशाच गेल्या वर्षी दाखल केलेल्या एका प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या



नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निकाल दिला. या निर्णयामुळे आर्थिक अडचणीतील पालकांसाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे.

६ ते १४ वयोगटातील मुलांचा शिक्षणाचा मूलभूत अधिकार कोणत्याही परिस्थितीत हिरावून घेता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले असून केवळ शैक्षणिक शुल्क (फी) थकले आहे. या कारणावरून १३ वर्षांच्या विद्यार्थ्याला शाळेतून काढून टाकले जाऊ शकत नाही, असा निकाल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला. न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठाने भंडारा येथील एका शाळेने इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्याला फी थकल्यामुळे दिलेला शाळा सोडल्याचा दाखला रद्द केला आहे.

निकालात न्यायालयाने म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेतील कलम २१ए आणि शिक्षण हक्क कायदा (आरटीई), २००९ अंतर्गत शिक्षणाचा अधिकार संरक्षित आहे. फी न भरल्यामुळे विद्यार्थ्याला शिक्षण नाकारणे न्यायालयाने निकालात बेकायदेशीर ठरवले आहे. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क नियमन) अधिनियम, २०११ मधील कलम ३(अ) चा संदर्भ देत खंडपीठाने सांगितले की, फी न भरल्यास विद्यार्थ्याची हकालपट्टी करण्याची तरतूद कायद्यात नाही. शिक्षण क्षेत्रात काम करणारे सामाजिक कार्यकर्ते या निर्णयाचे स्वागत करत आहेत. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# येत्या १ मार्चपासून सीम कार्डशिवाय 'व्हॉट्सअ‍ॅप' नाही

## सरकारचा मुदतवाढ देण्यास नकार

## वेब आवृत्ती दर ६ तासांनी होणार लॉग-आउट

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

'सीम बाइंडिंग'चे नियम लागू करण्याची २८ फेब्रुवारीची अंतिम मुदत वाढवली जाणार नाही, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले. नवीन नियमांनुसार फोनमध्ये सीम कार्ड नसल्यास व्हॉट्सअ‍ॅपसारखे मेसेजिंग अ‍ॅप काम करणार नाहीत. कॉम्प्युटरवर लॉगिन केलेले व्हॉट्सअ‍ॅपदेखील ६ तासांत लॉग-आउट होणार आहेत. जेव्हा तुम्ही एखाद्या अ‍ॅपला सीम बाइंडिंगशी जोडता, तेव्हा ते अ‍ॅप तेव्हाच उघडेल जेव्हा तुमचे नोंदणीकृत सीम कार्ड त्याच फोनमध्ये असेल. हा नियम १ मार्च २०२६ पासून लागू होणार आहे.

केंद्रीय संचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी सांगितले की, हे नियम राष्ट्रीय सुरक्षा आणि फसवणूक रोखण्यासाठी लागू करण्यात आले आहेत आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर सरकार तडजोड करणार नाही. युजर्सना हे सुनिश्चित करावे लागेल की त्यांचे व्हॉट्सअ‍ॅप ज्या नंबरवर आहे, ते सीम त्याच फोनमध्ये असावे. जर सीम कार्ड फोनमधून काढले तर मेसेजिंग अ‍ॅप काम करणार नाही.

# देशातील ६० हजार अधिकृत आधार केंद्र गुगल मॅपवर

## यूआयडीएआय आणि गुगलची भागीदारी

◆ **नवी दिल्ली वृत्तसंस्था):**

देशातील ६० हजार अधिकृत आधार केंद्रांची माहिती आता गुगल मॅपवर पाहायला मिळणार आहे. आता जवळच्या आधार केंद्राचा पत्ता आणि उपलब्ध सेवा गुगल मॅपवर सापडतील. अधिकृत आधार केंद्रे गुगल मॅप्सवर प्रदर्शित करण्यासाठी युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया (यूआयडीएआय) आणि गुगलने भागीदारी केली आहे.




गुगल आणि यूआयडीएआयमधील सहकार्याच्या पुढील टप्प्यात आधार केंद्राची माहिती व्यवस्थापित करण्यासाठी आणि लोकांच्या अभिप्रायाला थेट प्रतिसाद देण्यासाठी गुगल व्यवसाय प्रोफाइलचा वापर करणार आहे. भविष्यात, भागीदारी गुगल नकाशे इंटरफेसद्वारे थेट अपॉइंटमेंट बुकिंग करता येईल. गुगल आणि यूआयडीएआय यांच्याकडून भागीदारी केल्यानंतर अधिकृत आधार केंद्र गुगल मॅपवर दिसतील. यामुळे देशभातील नागरिकांना अधिकृत आधार केंद्रांची माहिती सहजपणे मिळेल.

आधार केंद्रांकडून ज्या प्रकारच्या सेवा दिल्या जातात, त्यानुसार आधार केंद्रांची माहिती गुगल मॅपवर दिसेल. लहान मुलांची नोंदणी, प्रौढ नागरिकांची नोंदणी, फक्त पत्ता अपडेट करणे, मोबाईल क्रमांक अपडेट करणे यानुसार माहिती गुगल मॅपवर दिसेल. दिव्यांगांच्या सोयींची उपलब्धता, इन्फ्रास्ट्रक्चर, पार्किंग सुविधा, कामाचे तास याबाबतची माहिती गॅगल मॅपवर उपलब्ध असेल. याबाबतच्या सुविधा येत्या काही दिवसांत गुगल मॅपवर दिसतील.

आयटी मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील काही महिन्यांत गुगल मॅप्सवर हे फीचर उपलब्ध होईल. शिवाय, गुगल मॅप्सवर आधार सेंटर शोधल्याने प्रौढांची नोंदणी कोणत्या केंद्रांवर होते, मुले कुठे आधार कार्ड बनवू शकतात आणि आधार कार्डवर फक्त पत्ता किंवा मोबाईल नंबर कुठे अपडेट करता येतो हे कळेल. आधार सेंटर अपंगांसाठी अनुकूल आहे की नाही, त्यात पार्किंगची सुविधा आहे की नाही, सेंटर कधी उघडे आहे आणि कधी बंद आहे याची माहिती लोकांना मिळेल. सेंटर शोधताना अशी सर्व माहिती उपलब्ध होईल.

यूआयडीएआयच्या म्हणण्यानुसार, देशभरात ६० हजार आधार सेवा केंद्रे आहेत. लोकांना या केंद्रांपर्यंत पोहोचण्यात अनेकदा अडचणी येतात. कधीकधी चुकीच्या माहितीमुळे माहिती हरवते. त्यामुळे सर्व केंद्रांची आणि कोणत्या सेवा पुरवल्या जातात याची संपूर्ण माहिती असणे लोकांसाठी सोयीचे असेल.

# ब्रिटनमध्ये यापुढे प्रवेशासाठी डिजिटल परमिट

## ८५ देशांतील प्रवाशांना घ्यावे लागेल प्रवासपूर्वी परवाना

◆ **लंडन (वृत्तसंस्था) :**

ब्रिटनने ८५ देशांमधून येणाऱ्या प्रवाशांसाठी बुधवारपासून इलेक्ट्रॉनिक ट्रॅव्हल ऑथोरायझेशन (ईटीए) अनिवार्य केले आहे. या नियमानुसार, वैध ईटीए, ई-व्हिसा किंवा इतर आवश्यक कागदपत्रांशिवाय प्रवाशांना एअरलाइन्स बोर्डिंगची परवानगी देणार नाहीत.ईटीए योजना २०२३मध्ये सुरू करण्यात आली होती. या अंतर्गत, ज्या प्रवाशांना व्हिसाची आवश्यकता नसते, त्यांना प्रवासपूर्वी ऑनलाइन अर्ज करून १६ ब्रिटिश पाउंड (सुमारे १९७० रुपये) शुल्क भरून प्री-ट्रॅव्हल परमिट घ्यावे लागेल.

ईटीए हे एक डिजिटल एंट्री परमिट आहे, जे परदेशी प्रवाशांसाठी आवश्यक असते, ज्यांना व्हिसाची गरज नसते. हे पासपोर्टशी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जोडलेले असते आणि प्रवाशांच्या सुरक्षा तपासणीसाठी वापरले जाते. तर ई-व्हिसा हा डिजिटल व्हिसा असतो, जो पासपोर्टवर लागणाऱ्या कागदी व्हिसा स्टिकरची जागा घेईल.

एप्रिल २०२४ मध्ये ते युरोपीय प्रवाशांपर्यंत वाढवण्यात आले होते; परंतु आतापर्यंत त्याची कठोर अंमलबजावणी होत नव्हती. २५ फेब्रुवारीपासून ते पूर्णपणे लागू झाले आहे. ही नवीन व्यवस्था जुन्या पासपोर्टवर लागणाऱ्या कागदी व्हिसा स्टिकरची जागा घेईल. ब्रिटिश आणि आयरिश नागरिक, दुहेरी नागरिकत्व असलेले आणि ब्रिटनमध्ये राहण्याचा अधिकार असलेल्यांना या नियमातून सूट देण्यात आली आहे.

ब्रिटनचे स्थलांतरण आणि नागरिकत्व मंत्री माईक टॅप यांनी सांगितले की, हे पाऊल सीमा सुरक्षा मजबूत करण्यासाठी आणि प्रणालीला अधिक आधुनिक बनवण्यासाठी उचलण्यात आले आहे. ब्रिटनचे स्थलांतर मंत्री माईक टॅप यांनी सांगितले की, ईटीए योजना देशाच्या सीमा सुरक्षा मजबूत करण्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यांच्या मते, यामुळे प्रवेश प्रणाली अधिक आधुनिक आणि प्रभावी बनेल.